जाक्र.पोआ/रमजान/मीना बझार/ 26 /2024 सोलापुर शहर दिनांक 01/04/2024

# जाहिरनामा

ज्याअर्थी, दिनांक- 03/04/2024 ते दिनांक11/04/2024 या कालावधीत विजापुर वेस या ठिकाणी रमजान ईद उत्सव निमित्त मीना बझार नावाचा बाजार मोठया प्रमाणात भरत असतो. सदर ठिकाणी खालील नमूद मार्गावर खरेदीसाठी येणाऱ्या लोकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. त्या ठिकाणी वाहनांमुळे अपघात होवून जिवीतास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यास प्रतिबंध करणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी एम.राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापुर शहर, मला प्राप्त असलेल्या महाराष्ट्र पोलीस कायदा, 1951 चा अधिनियम क्र. 22 चे कलम 33(1) व (ब) या अधिकारान्वये, खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

**दिनांक - 03/04/2024 चे सकाळी 08.00 वा.पासुन ते दिनांक -11/04/2024 रोजीचे 24:00 वा.पर्यत खालील मार्गावरुन विजापुर वेस कडे येण्यास व जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनास बंदी केलेली आहे.**

**वाहनांसाठी बंद करण्यात आलेले मार्ग**

**(1) बेगम पेठ पोलीस चौकी ते विजापुर वेस**
**(2) बाराईमाम चौक ते विजापुर वेस**
**(3) बाकळे प्रेस ते विजापुर वेस**
**(4) लक्ष्मी मार्केट ते विजापुर वेस**
**(5) पंचकट्टा ते विजापुर वेस**
**(6) पेंटर चौक ते विजापुर वेस**
**(7) रंगरेज बोळ ते विजापुर वेस**
**(8) माणिक चौक ते विजापूर वेस**

**वाहनांसाठी पर्यायी मार्ग**

- **माणिक चौक - समाचार चौक - भावसार पथ - बाराईमाम चौक - किडवाई चौक मार्गे - बेगमपेठ पोलीस चौकी - पंचकट्टा - लक्ष्मी मार्केट - दत्त चौक या पर्याची मार्गाचा वापर करतील.**

दिनांक- 03/04/2024 चे 08.00 वा.पासुन ते दिनांक - 11/04/2024 रोजीचे 24:00 वा.पर्यत हा आदेश अंमलात राहील. सदर आदेशाचा भंग करणारा कायदयाप्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

**अपवाद वाहने** - पोलीस, फायर ब्रिगेड, ॲम्ब्युलन्स या वाहनांना हा जाहिरनामा लागू होणार नाही.

हा जाहिरनामा माझ्या सही व शिक्यानिशी प्रसिध्द केला आहे.

1/4/24.

पोलीस आयुक्त, सोलापूर (शिक्का)

**( एम.राज कुमार )**
**पोलीस आयुक्त, सोलापुर शहर**

प्रति,
1) पोलीस उप-आयुक्त परिमंडळ, मुख्यालय, गुन्हे/विशा, सोलापुर शहर
2) सहा.पोलीस आयुक्त/विभाग 1 व 2, नियंत्रण कक्ष, गुन्हे शाखा, शवाशा सोलापुर शहर
3) शहरातील सर्व संबंधीत पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी.
4) प्रसिध्दी करिता प्रभारी अधिकारी,माहीती कक्ष, सोलापुर शहर.

2/- सदर जाहीरनामा स्थानिक वर्तमान पत्र/वृत्तवाहिनीवर प्रसिध्द करावा.

Scanned with OKEN Scanner